## २७ रोजगार व स्वंयरोजगार विभागास नेमून दिलेले विषय

* दिनांक ११ जून, १९९७ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे शीर्ष, उपशीर्ष व नोंदी समाविष्ट करण्यात आल्या.

**एक रोजगार व स्वंयरोजगार**

१. सेवायोजन कार्यालय संघटना.

२. सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार व स्वंयरोजगार योजना (बीज भाडंवल योजना वगळून)

३. मनुष्यबळ नियोजन.

४. रोजगार, बेरोजगार व स्वंयरोजगार धोरण (व्यापक धोरण, तत्वे आणि समन्वय )

५. रोजगाराच्या विशेष योजनांची अमंल बजावणी (रोजगार हमी योजना वगळून)

६. मंत्रालयातील सर्व विभागातील विविध योजनांचे रोजगार / स्वंयरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संनियंत्रण, समन्वय आणि पर्यवेक्षण.

**दोन सर्वसाधारण**

७. रोजगार व स्वंयरोजगार विभागाच्या कक्षातील कोणत्याही बाबी संबंधीत हुकूमान्वये येणे असलेल्या रकमा निर्लेखित करणे.

८. या सुचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

९. कोणत्याही न्यायालयात घेण्यात येणारी फी वगळून या सूचीतील कोणत्याही बाबींच्या संबधातील फी.

१०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली व या विभागाकडे अभिहस्तांकित केलेली बांधकामे, जमिनी व इमारती.